Maharashtra State Board of
Secondary & Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Pl No. 178,179, Near Balchitrawani, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda, Shivajinagar,
Pune-411004.

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे
स.नं.८३२-ए, फा.प्लॉ.नं.१७८,१७९,बालचित्रवाणी शेजारी, आघारकर
रिसर्च इन्स्टिटयूटच्या मागे, भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे ४११००४

Email : secretary@msbshse.ac.in Telegram : MAHABOSEC, PUNE.
Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 । EPABX -25705000 Fax : 25665807 । Secretary(P) : 25651750

क्र.रा.मं./परीक्षा-७/६५७
पुणे ४११ ००४.
दिनांक- ३१/०१/२०१८
०२ ०२

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे

विषय - राष्ट्रीय व राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थितीमध्ये सवलत देण्याबाबत ..

संदर्भ - १. शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८५/एसडी-२ दि.१६/११/२०१६
२. या कार्यालयाचे पत्र क्र.रा.मं./परीक्षा-७/१०६२ दि.०१/०३/२०१७

उपरोक्त विषयी संदर्भिय परिपत्रक व पत्र पहावे. राष्ट्रीय व राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या इयत्ता ९वी ते १२वी मधील खेळाडू विद्यार्थ्यांना संबंधित शैक्षणिक वर्षातील त्यांच्या शाळेतील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पर्यंत असल्यास ती ग्राहय धरण्यात यावी. अपवादात्मक परिस्थितीत संबंधित खेळाडू विद्यार्थ्याची शाळेतील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पेक्षा कमी असल्यास त्यास संबंधित जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या पूर्व परवानगीने वार्षिक परीक्षेस बसण्याची अनुमती द्यावी. सदर पूर्व परवानगी घेण्याची जबाबदारी संबंधित शाळा/क.म.वि.च्या मुख्याध्यापक/प्राचार्यांची राहील. तसेच अशा विद्यार्थ्यांच्या पालकांनी त्यांचा पाल्य कोणत्या राष्ट्रीय/राज्य क्रीडा स्पर्धामध्ये सहभागी होणार आहे/झाला आहे याबाबतचा आवश्यक तपशील शाळेतील मुख्याध्यापकांकडे देणे अनिवार्य राहील. असे नमूद केले आहे.

तथापि या संदर्भात कळविण्यात येते की,'इयत्ता १० वी व १२ वी साठी अपवादात्मक परिस्थितीत संबंधित खेळाडू विद्यार्थ्याची शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पेक्षा कमी असल्यास त्यास संबंधित विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या पूर्व परवानगीने मंडळाच्या इ.१०वी व १२वी परीक्षेस बसण्याची मान्यता घ्यावी. सदर पूर्व परवानगी घेण्याची जबाबदारी संबंधित शाळेच्या/कनिष्ठ महाविद्यालयाच्या मुख्याध्यापकाची/प्राचार्यांची राहील.' याप्रमाणे सुधारित आदेश निर्गमित करण्याबाबत करण्याबाबत शासनास विनंती करण्यात आली आहे.

शासनादेश प्रतिक्षित आहेत. तरी सदर प्रकरणी फेब्रुवारी-मार्च २०१८ च्या परीक्षेकरिता इयत्ता १० वी व १२ वी साठी अपवादात्मक परिस्थितीत संबंधित खेळाडू विद्यार्थ्याची शाळा/कनिष्ठ महाविद्यालयातील दैनंदिन उपस्थिती किमान ६०% पेक्षा कमी असल्यास संबंधित मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी विभागीय सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ यांच्या पूर्व परवानगीने मंडळाच्या इ.१०वी व १२वी परीक्षेस बसण्याची मान्यता घेण्याची कार्यवाही करण्याबाबत आपल्या विभागातील सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये यांना कळविण्यात यावे व कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सचिव
राज्य मंडळ, पुणे ४.

पत्र क्र. नाविमं/पमा/550
नागपूर दि. 08/02/2018

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय,
नागपूर विभाग, नागपूर

राष्ट्रीय व राज्य पातळीवरील क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थितीमध्ये सवलत देण्याबाबत उपरोक्त राज्य मंडळाचे पत्रानुसार कार्यवाही करावी.

विभागीय सचिव,
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर